निशाण ५ खालील आदेश

अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सर्व कागदपत्रे पाहिली.

०२. वादीच्या म्हणण्यानुसार मौजे पोहाळे तर्फ आळते ही दावा मिळकती वादी व प्रतिवादींचे पूर्वहक्कदार भिमराव कृष्णा मिसाळ यांना त्यांचे वडीलांचे कडून वारसा हक्काने प्राप्त झाल्या आहेत. वादी प्रतिवादींच्यात आजअखेर दावा मिळकतींचे वाटप झालेले नाही. परंतु सोईनुसार वहिवाट केली जाते. भिमराव कृष्णा मिसाळ यांची पहिली पत्नी दगडुबाई हिला बबन, आनंदी व संगिता अशी मुले झाली. दगडुबाईचे अकाली निधन झालेमुळे व मुले लहान असलेमुळे भिमरावने वादी क्र.१ शी विधिवत लग्न केले व त्या लग्न संबंधातून वादी क्र.२ व ३ चा जन्म झाला आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे भिमराव कृष्णा मिसाळचे कायदेशीर वारस आहेत. परंतु भिमरावचे मृत्यू पश्चात प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचे महसूल दप्तरी केवळ स्वतःच्या व स्वतःच्या बहिणीच्या नावाची नोंद करण्याची वर्दी दिली. त्याबाबत वादी क्र.१ ने हरकत घेतली व प्रतिवादींकडे दावा मिळकतींतील त्यांचे हिश्याचे वाटप करून देण्याची मागणी केली. प्रतिवादींनी त्यास नकार देऊन दावा मिळकतीतील वादींच्या सामाईक कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वादीस वाटपाचा दावा दाखल करून दाव्याचे अंतिम निकालापर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादींच्या समाईक कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तूर्तातूर्त ताकिद मागण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करावा लागला.

०३. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी नि.२२ येथे म्हणणे दाखल करून वादीची सर्व कथने नाकारली. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा दावा मिळकतींशी अगर मयत भिमरावशी काहीही संबंध नव्हता व नाही. वादी क्र.१ व मयत भिमरावचे लग्न झालेले नव्हते अगर ते नवरा बायको म्हणून कधीही कोठेही राहिलेले नव्हते व नाहीत. प्रतिवादी क्र.१ ची आई दगडाबाई हिच्याशी भिमरावचे लग्न १९६७ साली झाले होते

व त्यांना प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.२ ची आई व प्रतिवादी क्र.३ अशी अपत्ये झाली होती. मृत्यूसमयी भिमरावचे वय ६९ वर्ष होते व तो प्रतिवादी क्र.१ सोबतच राहत होता. भिमरावचे मृत्यूपश्चात कायदेशीर गोष्टींच्या पूर्ततेनंतर दावा मिळकतींना प्रतिवादी क्र.१ ते ३ च्या नावाची नोंद झालेली आहे. वादींचा दावा मिळकतींशी कोणताही हक्क हितसंबंध नसताना गावातील काही लोकांच्या मदतीने खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून त्यांनी भिमरावच्या मिळकतीत हक्क सांगण्यास सुरुवात केली व त्यासाठीच प्रस्तुतचा खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र.२,४,८,९,११ यांनी त्यांचे म्हणणे न दिल्यामुळे अर्जाचे कामकाज त्यांचे म्हणण्याशिवाय चालविण्यात आले. प्रतिवादी क्र.५ व १० यांना दावा समन्सची योग्यरित्याबजावणी होऊन देखील ते गैरहजर राहिलेमुळे अर्जाचे काम त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

०५. दोन्ही बाजुंच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसहित खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे शाबीत करतात की, प्रथमदर्शनी केस त्यांचे बाजुने आहे ? | नकारार्थी |
| २ | वादी हे शाबीत करतात का की, न्यायाचा तराजु त्यांचे बाजुने आहे ? | नकारार्थी |
| ३ | वादी हे शाबीत करतात का की, तूर्तातूर्त ताकीद न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे ? | नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. १ ते ४

०६. मयत भिमराव कृष्णा मिसाळ याच्या पहिल्या पत्नीचे नाव दगडुबाई होते व त्यांचे लग्न १९६७ साली झाले होते याबाबत वाद नाही. प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.२ ची आई व प्रतिवादी क्र.३ ही त्यांची अपत्ये आहेत याबाबत वाद नाही. दावा मिळकती या भिमरावच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत याबाबतही वाद नाही. वादीच्या म्हणण्यानुसार दगडाबाईच्या मृत्यूपश्चात भिमरावने वादी क्र.१ शी लग्न केले व सदर लग्नसंबंधातून वादी क्र.२ व ३ चा जन्म झाला आहे. प्रतिवादींनी वादींचे म्हणणे नाकारून वादींचा मयत भिमरावशी अगर दावा मिळकतीशी काहीही संबंध नव्हता व नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे वादी हे मयत भिमरावचे कायदेशीर वारस आहेत हे प्रथमदर्शनी वादींनी शाबीत केले आहे का हे पाहिले पाहिजे.

०७. वादींच्या म्हणण्यानुसार दगडुबाईचे अकाली निधन झालेमुळे व मुले लहान असल्याने भिमरावने वादी क्र.१ शी लग्न केले. आपले म्हणणे शाबीत करणेसाठी वादींनी नि.२८ सोबत विवाह यादी दाखल केली आहे. त्यामध्ये भिमराव मिसाळ व राधिका पोवार यांचा विवाह दि.०७.०५.१९९९ रोजी ठरल्याचे दिसून येते. यावरुन भिमराव व वादी क्र.१ चे कथीत लग्न १९९९ साली झालेचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नि.३७ सोबत अ.क्र.२,३ येथे दाखल केलेल्या दाखल्यांच्या अवलोकनावरुन वादी क्र.२ व ३ यांच्या वडीलांचे नाव भिमराव कृष्णा मिसाळ व आईचे नाव लक्ष्मी भिमराव मिसाळ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु सदर दाखल्यात नमूद असलेली भिमराव कृष्णा मिसाळ नावाची व्यक्ती व दावा मिळकतींचा पूर्व हक्कदार असलेली भिमराव कृष्णा मिसाळ नावाची व्यक्ती एकच असलेबाबत वादीने कोणताही पुरावा पुढे आणलेला नाही. नि.४० सोबत प्रतिवादींनी दाखल केलेल्या विवाह नोंदणी फार्मच्या अवलोकनावरून भिमराव व दगडूबाई यांचे लग्न दि.१३.०६.१९६७ रोजी झालेचे दिसून येते. तसेच नि.४० सोबत दाखल केलेल्या मृत्यू दाखल्यावरून दगडाबाई दि.०६.१०.१९९१ रोजी

मयत झालेचे दिसून येते. नि.४० सोबतच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यांच्या अवलोकनावरून प्रतिवादी क्र.१ चा जन्म १.०६.१९७० रोजी झाल्याचे, प्रतिवादी क्र.२ च्या आईचा जन्म दि.०१.०६.१९७७ रोजी झालेचे व प्रतिवादी क्र.३ चा जन्म दि.०१.०६.१९७६ रोजी झालेचे दिसून येते. म्हणजे १९९१ साली दगडाबाई मयत झाली तेव्हा प्रतिवादी क्र.१ चे वय २१ वर्षे, प्रतिवादी क्र.२ च्या आईचे वय १४ वर्षे व प्रतिवादी क्र.३ चे वय १५ वर्षे होते असे दिसून येते. तसेच नि.४० सोबतचे प्रतिवादी क्र.१ च्या मुलीच्या व मुलांच्या जन्म तारखांचे दाखले पाहिले असता १९९३ साली प्रतिवादी क्र.१ यास एक मुलगी, १९९८ साली एक मुलगा झाल्याचे दिसून येते. म्हणजे १९९९ साली वादी क्र.१ शी कथीत लग्न करतेवेळी भिमरावच्या मुलाचे म्हणजे प्रतिवादी क्र.१ चे लग्न झालेले होते व त्याला दोन मुले होती हे स्पष्ट होते. त्यामुळे दगडाबाईच्या निधनाच्या वेळी तिची मुले लहान असलेमुळे भिमरावने वादी क्र.२ शी दुसरे लग्न केले हे वादींचे म्हणणे विश्वासार्ह वाटत नाही.

०८. वादींनी दाव्यात अगर अर्जात कोठेही वादी क्र.१ चे भिमरावशी लग्न नक्की किती तारखेला, कुठे, कोणा समक्ष झाले याचा कोणताच तपशिल नमूद केलेला नाही. वादीतर्फे साक्षीदार ज्योतिराम कृष्णा मिसाळ, सोनाबाई रामचंद्र मिसाळ व बाबासो लहु मिसाळ यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात सदर लग्नाचा तपशिल दिलेला नाही. त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात केवळ वादी क्र.१ ही भिमरावची विधिवत लग्नाची बायको असल्याचे व वादी क्र. २ व ३ ही त्यांची मुले असल्याचे नमूद केले आहे. त्यांनी कोठेही ते सदर लग्नाला हजर होते अगर भिमराव व वादी क्र.१ हे पती पत्नी या नात्याने एकत्र राहत होते असे नमूद केलेले नाही. त्यामुळे वादी क्र.१ व मयत भिमरावचे लग्न झाले होते हे प्रथमदर्शनी विश्वासार्हरित्या शाबीत करण्यात वादीला अपयश आले आहे. वादीच्या वकीलांनी या कामी ***एआयआर २०१५ सुप्रीम कोर्ट २३८२–धन्नुलाल विरुध्द गणेशराम व १९९८ (४) सिव्हील लॉ जर्नल ७१८ (मध्यप्रदेश उच्च न्यायालय)–एस.पी.श्रीवास्तव विरुध्द काशीबाई*** या न्यायनिर्णयांची प्रत हजर केली आहे. सदर न्यायनिर्णयांमध्ये एक स्त्री

व पुरुष सातत्याने बराच काळ एकत्र राहत असल्यास त्यांच्यात लग्न झालेले नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी लग्न नाकारणा−या पक्षकारावर असते असे नमूद केलेले आहे. परंतु या कामी वादी अगर त्यांचे साक्षीदार कोठेही वादी क्र.१ व भिमराव पती पत्नी या नात्याने एकत्र राहत होते असे म्हणत नाहीत व तसा पुरावाही आणत नाहीत. त्यामुळे सदर न्यायनिर्णय या कामी वादीस उपयोगी ठरू शकत नाहीत.

०९. वादी व त्यांच्या साक्षीदारांच्या तोंडी कथनांशिवाय दावा मिळकतीत वादींचा प्रत्यक्ष कब्जा आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादींनी पुढे आणलेला नाही. वादींनी दाव्यामध्ये व अर्जात वादी प्रतिवादींची सोईनुसार वहिवाट असल्याचे नमूद केले असले तरी अशी सोईनुसार वहिवाट नक्की कशी व कुठे आहे हे नमूद केलेले नाही. दावा मिळकतींच्या महसूल दप्तरी कधीही वादींच्या नावाची मालक व वहिवाटदार म्हणून नोंद झालेली नाही. त्यामुळे दावा मिळकतींत वादींचा प्रत्यक्ष कब्जा आहे हे शाबीत करण्यात वादींना अपयश आले आहे. तसेच दावा मिळकतीतील वादींच्या कथीत कब्जास प्रतिवादी हरकत अडथळा करीत असल्याचे शाबीत करण्यातही वादींस अपयश आले आहे. वादाकरीता दावा मिळकतीत वादींचा समाईकात कब्जा आहे असे गृहित धरले तरी वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीत सहहिस्सेदार असलेमुळेही वादीस प्रतिवादीविरुध्द ताकीद मागता येणार नाही. अशा प्रकारे प्रथमदर्शनी केस शाबीत करण्यात वादीस अपयश आले आहे. न्यायाचा तराजु प्रतिवादींच्या बाजुने आहे. त्यामुळे वादीचे मागणीप्रमाणे तूर्तातूर्त ताकीद दिल्यास प्रतिवादींचेच अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मी सर्व मुद्दयांचे उत्तर नकारार्थी देऊन खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

सही/-

दि.२१.०६.२०१७. (अ.ग.बेहेरे)

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,पन्हाळा

I affirm that the contents of this P.D.F.file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer: | G.U.Joshi |
| Date of Dictation | 21/06/17 |
| Name of P.O. | A.G.Behere |
| Judgment signed by the P.O.on | 21/06/17 |
| Judgment uploaded on | 21/06/17 |